


# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २०१ वा ❑ शुक्रवार दि.२६ सप्टेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## लडाखमध्ये आंदोलन का सुरू आहे?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

नेपाळ मधील जे जी क्रांतीनंतर भारताला अस्थिर करण्याचा प्रयत्न काही विरोधी पक्षांकडून व असामाजिक तत्वांकडून होत आहे.याचा प्रत्यय आय लव्ह मोहम्मद वरून मुस्लिम समुदाय रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहे.काहीसा असाच प्रकार लडाख मध्ये बघायला मिळत नाही..शांत असणारा लडाख मध्ये अचानक का पेटला ?

लडाखला राज्याचा दर्जा मिळावा आणि सहाव्या अनुसूचीत समाविष्ट करावे या मागणीसाठी पाच वर्षांपासून सुरू असलेल्या आंदोलनाला बुधवारी हिंसक वळण लागले. यात चार जणांचा मृत्यू झाला आणि जवळपास डझनभर वाहने जाळण्यात आली आणि त्यांचे नुकसान झाले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रशासनाला प्रतिबंधात्मक आदेशांचा अवलंब करावा लागला.

अलिकडच्या काळात स्थानिक–बाहेरील समस्या ज्या प्रकारे वाढल्या आहेत त्यावरून असे दिसून येते की हा हिंसाचार अपघाती नव्हता तर अरब स्प्रिंग आणि नेपाळच्या जनरेशन झेड सारखी परिस्थिती निर्माण करण्यासाठी चिथावणी देण्यात आली होती, कारण लडाखींच्या विविध मागण्या मान्य करण्यात आल्या होत्या आणि राज्यत्व आणि सहाव्या अनुसूचीवरील गतिरोध सोडवण्यासाठी पुढील महिन्यात एक बैठक आयोजित करण्यात आली होती.तरी देखील लडाख मध्ये हिंसक आंदोलन जाणीवपूर्व निर्माण करण्याचा प्रयत्न काही असामाजिक तत्वांकडून केला जात आहे.

लडाखमध्ये चार जिल्हे निर्माण करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे, तर लडाखमध्ये अनुसूचित जमातींसाठी आरक्षण ४५ टक्क्यांवरून ८४ टक्के करण्यात आले आहे. पंचायतींमध्ये महिलांना १/३ आरक्षण देण्यात आले आहे. बोटी आणि पारगी यांना अधिकृत भाषा घोषित करण्यात आल्या आहेत.

यासोबतच, १,८०० पदांसाठी भरती प्रक्रिया देखील सुरू करण्यात आली. स्वतंत्र लोकसेवा आयोगाच्या स्थापनेचाही विचार केला जात आहे आणि हे सर्व लडाखच्या विविध संघटना आणि केंद्रीय गृह मंत्रालयाने स्थापन केलेल्या उच्चाधिकार समिती यांच्यातील विविध बैठकांमध्ये झालेल्या करारांचे परिणाम आहे.

६ ऑक्टोबर रोजी लेह सर्वोच्च संस्था आणि केंद्र सरकारच्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीपूर्वी नेमके काय घडले ज्यामुळे हिंसाचार झाला हे कोणाच्याही समजण्यापलीकडे आहे. लॅब नेत्यांची विधाने प्रक्षोभक ठरली. लवकर बैठकीची मागणी असूनही, केंद्र सरकार २५–२६ सप्टेंबर रोजी बैठक घेण्याच्या पर्यायावर विचार करत होते.

सोनम वांगचुक आणि काँग्रेस नेत्यांवर आरोप

हिंसाचार भडकवण्यात सोनम वांगचुक आणि काही स्थानिक काँग्रेस नेत्यांची भूमिका संशयाच्या पलीकडे आहे. हा पक्षपाती आरोप मानता येणार नाही, कारण लेह ऑटोनॉमस हिल डेव्हलपमेंट कौन्सिलमधील काँग्रेस नगरसेवकाचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये तो प्रक्षोभक विधाने करताना दिसत आहे आणि कथितपणे हिंसक निदर्शकांच्या आघाडीवर आहे.

पर्यावरणवादी आणि सामाजिक कार्यकर्त्या म्हणून त्यांच्या कथित प्रतिमेच्या आडून गेल्या काही वर्षांपासून उघडपणे राजकारणात सहभागी असलेल्या पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांच्या भूमिकेबद्दलही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अलिकडेपर्यंत, ते लडाखच्या पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या नावाखाली लडाखमधील इतर राज्यातील लोकांचा विरोध करत होते आणि गेल्या काही वर्षांपासून ते लडाखच्या सामाजिक–सांस्कृतिक मूल्यांचे रक्षण करणारे म्हणून स्वतःला सादर करत आहेत.

सोनम वांगचुक यांच्या स्वयंसेवी संस्थेबद्दल आणि त्यांना मिळणाऱ्या परदेशी देणग्यांबद्दल वारंवार प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. त्यांनी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी सरकारकडून शेकडो एकर जमीन कवडीमोल किमतीत विकत घेतली, परंतु विद्यापीठ कधीच बांधले गेले नाही आणि शेवटी सरकारने ते परत मिळवले. त्यांच्या संस्थेच्या कारवायांचीही चौकशी सुरू आहे आणि यामुळे ते निराश दिसत आहेत.

त्यांनी लडाखमधील सुरू असलेल्या आंदोलनासाठी अरुंधती रॉय यांना लेह येथे आमंत्रित केल्याचेही वृत्त आहे. २०१० मध्ये काश्मीर खोऱ्यात झालेल्या हिंसक निदर्शनांबद्दल अरुंधती रॉय यांनी जे लिहिले आणि प्रचार केला त्यावरून भारतीय लोकशाही आणि मुख्य प्रवाहाबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. त्यांनी काश्मीरच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. यावरून असे सूचित होते की लडाखमधील सुरू असलेल्या आंदोलनात सोनम वांगचुक यांचा सहभाग हा एका मोठ्या कटाचा भाग असू शकतो.

सोनम वांगचुक यांच्या अलीकडील विधानांवरून आणि व्हिडिओंवरून असे दिसून येते की त्यांनी लडाखमधील अरब स्प्रिंगसारख्या चळवळीवर भर दिला आणि नेपाळमधील जनरेशन झेड निदर्शनांचे कौतुक केले. म्हणून, हा उत्स्फूर्त उठाव नव्हता; तो पूर्वनियोजित होता. चूक त्या तरुणांची नाही ज्यांना दिशाभूल करून शोषण करण्यात आले.

हिंसेनंतर सोनम वांगचुक यांनी माध्यमांना काय सांगितले?

या भागात सोनम वांगचुक यांनी माध्यमांना दिलेले एक विधान देखील उल्लेखनीय आहे, ज्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की निदर्शकांना देशाला लाज वाटेल असे काहीही करायचे नाही, म्हणून ते शांततेत आंदोलन सुरू ठेवू इच्छितात. याचा अर्थ असा होतो की ते हिंसाचारासाठी तयार होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, लेह जळत असताना त्यांनी उपोषण सोडले, शांततेचे आवाहन करण्याची परंपरा पाळली आणि शांतपणे त्यांच्या गावी परतले.

श्रीनगरचे माजी महापौर जुनैद अझीम मट्टू यांनी लडाख हिंसाचारावर दुःख व्यक्त करत म्हटले की, हिंसाचार हा कोणत्याही न्याय्य आंदोलनाला संपवण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे. यामुळे फक्त दुःख आणि निराशाच होईल. यामुळे लडाखच्या लोकांच्या आशा आणि आकांक्षांचे चुकीचे वर्णन करण्यासाठी आधार निर्माण होईल. शांततापूर्ण संघर्ष लांब असू शकतो, परंतु तोच एकमेव योग्य मार्ग आहे.

# महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेच्या पारितोषिकांचे वितरण

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई –** महाराष्ट्राची परंपरा असेलल्या गणेशोत्सवाला राज्य शासनाने राज्य महोत्सवाचा दर्जा दिला असून सामाजिक सौहार्द, कला संस्कृतीचे प्रतिक असलेल्या गणेशोत्सवाची व्यापकता येत्या काळात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढवणार असल्याचे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य, माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी केले.

प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिरात आयोजित महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेच्या राज्य व जिल्हास्तरीय पारितोषिक वितरण कार्यक्रमात सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार बोलत होते. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार महेश सावंत, सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपसचिव नंदा राऊत, पु.ल.देशपांडे अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर उपस्थित होत्या.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार म्हणाले की, राज्यातील ऐतिहासिक बारा गडकिल्ल्यांना युनेस्कोद्वारा जागतिक वारसा मानांकन प्राप्त झाले



आहे. महाराष्ट्रात गणेशोत्सवाला शंभर वर्षांची प्रदिर्घ परंपरा लाभलेली आहे. आज देशविदेशात विविध ठिकाणी हा उत्सव उल्हासात साजरा केला जातो. सामजिक एकोपा, राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लावणारा आणि लोककला, लोकसंस्कृती, लोकसंवाद यांना बळ देणारा गणेशोत्सव हा सर्वधर्मीय, सौहार्द जोपासणारा महत्त्वाचा उत्सव आहे. त्याची व्यापकता ही राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत वाढवण्याचा शासनाचा मानस असून यादृष्टीने देशातील विविध राज्यात तसेच विदेशांमध्येही विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहे. या उत्सवात सक्रियपणे सहभागी होणाऱ्या गणेशमंडळांच्या कामांची दखल घेत नाविन्यपूर्ण आणि सामाजिक उपक्रम राबवणाऱ्या गणेशोत्सव मंडळाच्या कामांना प्रोत्साहन देण्याच्या व्यापक उद्देशाने शासनाने महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या राज्यस्तरीय तसेच जिल्हास्तरापर्यंत असलेल्या स्पर्धा तालुकास्तरापर्यंत घेण्याचा निर्णय घेऊन यावर्षीपासून स्पर्धेत तालुकास्तराचा समावेश केला. या स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने गणेशमंडळानी सहभाग घेत उत्तम प्रतिसाद दिल्याबद्दल तसेच सर्व विजेत्या मंडळांचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. शेलार यांनी अभिनंदन केले.

राज्यात अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण झाली असून मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार बाधितांना आवश्यक साहाय्य शासनस्तरावरुन करण्यात येत आहे. या पूरस्थितीत गणेशमंडळांनीही सहकार्य करण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी यावेळी केले. तसेच चित्रनगरी, गोरेगाव गणेश मंडळाने प्राप्त केलेले पारितोषिकाची रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीस देत असल्याचेही मंत्री ॲड. शेलार यांनी यावेळी जाहीर केले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विजेत्या मंडळांचा पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. प्रास्ताविक संचालक मीनल जोगळेकर यांनी केले. महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेत राज्यात पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा येथील तिरंगा गणेशोत्सव मंडळाने प्राप्त केले. तर लातूर येथील वसुंधरा वृक्षारोपी गणेशोत्सव मंडळाने द्वितीय, अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील सुवर्णयोग तरुण मंडळाने तृतीय क्रमांक मिळविला.


# आपले सण.. आपले उत्सव...

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या भारतीय हिंदू धर्मामध्ये सणांचे खूप महत्त्व आहे. सण हे उत्साहात साजरे केले जातात,







किंबहुना सणांना उत्सवाचे स्वरुप येते. आपल्या पूर्वजांनी हिंदू धर्मीयांना अशा अनेक चालीरिती घालून दिल्या आहेत, आणि त्या प्रत्येक सणांमागे काहीतरी उद्देश हेतू नक्कीच होता, आहे. त्यामध्ये निसर्गानुरुप शास्त्रीय कारणे तर आहेतच. त्याशिवाय नकळतपणे एक शिस्तप्रिय व संस्कारक्षम असे मानवी जीवनासाठी आचार, व विचारांचे संतुलन आहे. सणासाठी सण नसून जर विचार केला तर त्यात प्रगल्भ अशी वैचारिक, मांडणी आहे. ते शास्त्रीय आधारावर आहेत.

निसर्ग आणि पंचमहाभूतांच्या तत्वावर आधारित आहेत. आता आपले सणवार हे आपल्याला निदान जे पन्नाशीच्या पुढील व्यक्ती आहेत त्यांनी त्यांच्या काळातील आईवडिल, आजीआजोबा वगैरे वडिल मंडळीकडून बर्याच गोष्टी ऐकल्या असतील. केल्या असतील, पाहिल्या असतील. त्यामुळे जुन्या काळांतील चालीरिती व सणावारांचे महत्त्व व त्यांचे अर्थ त्यांना चांगलेच माहित असून त्या परंपरा चालीरिती ते आजही पाळतात.

ज्यांच्या घरात अशा वडिलधाऱ्या व्यक्ती असतील त्या आपल्या पुढील पिढीला याचे चांगले मार्गदर्शन करतात.

प्रत्येक महिन्यात येणार्या सणांना एक वैशिष्ट्य पूर्ण महत्त्व आहे.

आपल्या मराठी महिन्यांच्या सुरुवाती पासूनच सणांना प्रारंभ होतो.



स्वप्न गंधा सतीश आंबेतकर
मुंबई. विरार.

चैत्रपालवीच्या हिरवाई दिमाखाने येणारा साडेतीन मुहूर्तांपैकी पहिला मुहूर्त गुढीपाडव्याच्या सणापासून आनंद, उत्साहाला सुरुवात होते.

आनंदाची मंगलमय गुढी जेव्हा दारात उभी राहते, सारी कडे चैतन्य पसरते. याच महिन्यात

रामनवमी, हनुमान जयंती, महावीर जयंती हे सणही मोठ्या उत्साहाने साजरे होतात.

वैशाखात अक्षय तृतीयेला अनन्यसाधारण महत्त्व मिळते, सर्व मंगलमय गोष्टी अक्षय तृतीयेला घडाव्या अशी सर्वांची धारणा असते. साडेतीन मुहूर्तांपैकी दुसरा मुहूर्त अक्षय तृतीया. भर पावसात येणाऱ्या वटपौर्णिमेला ज्येष्ठ महिन्यात तर सवाष्णीच्या आपल्या पतीच्या संरक्षणासाठी, स्वतः च्या अखंड सौभाग्यासाठी जी खडतर उपासना चालू असते, सदैव प्राणवायू स्रोत असणार्या वटवृक्षाची पूजा करतांना, आपल्याला जन्मोजन्मी हाच पती मिळावा म्हणून वटवृक्षाला बांधून ठेवणाऱ्या पतिव्रता दिसतात, त्याला साकडे घालून त्या आपल्या पतीचे आयुष्य वाढविण्यासाठी कठोर व्रत करतात.

धुवाधार पावसात येणाऱ्या आषाढ महिन्यात देवशयनी एकादशी येते, हा सण व उपवास ही खूप जण करतात, या महिन्यात येणाऱ्या गुरुपौर्णिमेला सुद्धा अनन्य साधारण महत्त्व आहे, गुरुंची पूजा करणे, दीक्षा घेणे, गुरुंचे आदरातिथ्य वगैरे, अनेक जणांचे खास गुरुजी असतात त्यांचे उत्सव स्वरुप कार्यक्रम आदराने केले जातात.

आषाढात दीप अमावस्या येते सर्व प्रकारच्या धातूच्या दिव्यांची पूजा. त्यांची रोषणाई, जीवनातला अंधार संपून प्रकाशाची वाट दाखविण्यासाठी.

निसर्ग सौंदर्याने नटलेल्या रिमझिम श्रावणधारांचा महिना म्हणजे तर सण उत्सवाचा राजाच. संपूर्ण श्रावण महिनाभर तर नुसती रोज वेगवेगळ्या सणांची यादीच.

श्रावणी सगळे दिवस कोणत्या नि कोणत्या देवांचे, त्याचे वार त्यांची वैशिष्ट्ये, आवडती फळे, फुले, नैवेद्य, त्यांच्या कथा, पौराणिक कथा माहात्म्य वगैरे, लहानपणापासून श्रावण महिन्याचे सगळे उपास, तापास आणि सण उत्सवाचे वातावरण आमच्या घरी असायचेच,त्यात सोम, मंगळ, गुरु, शनी उपास मध्ये चतुर्थी, कधीकधी आणखी कोणते उपवास लागोपाठ यायचे, तेव्हा उपास करणे, पूजापाठ, त्याची तयारी हे हौसेने, आनंदाचे विषय होते, खूप उत्साहात साजरे केले जायचे, सडासारवण, सफाई, पूजेची तयारी, आई, आजीचे सोवळेओवळे, आजोबांची देव पूजेची तयारी, वडिलांची पाहुण्यांची व्यवस्था, आई, आजीं पाकशाळेत पंचपक्वान्नांच्या, नैवेद्याच्या तयारीत, आमची भावंडांची छोट्या मोठ्या कामांची लुडबुड. नागपंचमीच्या तयारी, शिवामूठ,, चतुर्थी ची पूजा, बाकीच्या मधल्या वीरांचे त्याप्रमाणे महत्त्व असायचेच.

नारळी पौर्णिमा समुद्रावर गर्दी मोठ्या उत्साहात सण साजरा व्हायचा, रक्षाबंधन सुंदर राख्या बांधून भावावर बहिणीच्या रक्षण करणार्या जबाबदारी टाकण्याचा गोड सोहळा, भावा बहिणीच्या अतूट पवित्र नात्याचा धागा बांधण्याचा.

श्रावणी बेलाभिषेक, गोकुळाष्टमी बाळगोपाळ कृष्णजन्म उपवास, दिवसभर त्याच्या आगमनाच्या तयारी चे अति उत्साही वातावरण, मध्य रात्री कृष्ण मंदिरात हा कृष्ण जन्म सोहळा पहाण्यासाठी जात असू. आनंदी उत्साही वातावरणात तो सोहळा देवळात वरच्या माळ्यावरुन खाली पहात असू. **(क्रमशः)**

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-५४



*नक्षत्र मंडळातील १३ वे नक्षत्र 'हस्त' आहे. या नक्षत्राचा आराध्य वृक्ष "जाई-चमेली-मालती" आहेत. जाईलाच बऱ्याच भाषेत 'चमेली' या नावाने संबोधले जाते. दक्षिणेकडे 'मल्लीगा' म्हणतात. जाईला 'मल्ली' आणि मोगऱ्याला 'मल्लीगा' म्हटले जाते. जाई-जुई चमेली-मालती यांच्या वेलींना सर्वत्र 'जाई' च समजले जाते.*

*'कन्या' राशीच्या कांही जातकांचा जन्म 'हस्त' नक्षत्रात झालेला असतो. 'कन्ये' चा राशी स्वामी 'बुध' महाराज आहेत. पृथ्वीतत्वाची 'कन्या' राशी, हिरव्या रंगाच्या प्रभावाखाली असते. या राशीचा आराध्य वृक्ष "आंबा" आहे. व्यक्तीमत्व सुंदर आणि कलाप्रिय असणाऱ्या या राशीच्या जातकांना त्यांच्या नक्षत्राच्या आराध्य वृक्षांच्या प्राकृतिक गुणां प्रमाणे अनुभूती येते. 'वेली' या परावलंबी असतात. कुठल्यातरी आधाराशिवाय या नक्षत्रावर जन्मलेल्या जातकांना प्रगती साधता येणं कठीण असतं. खरं तर अशाच वेळी "वास्तुशास्त्र पेंटींग" चा खूप उपयोग होऊ शकतो.*

*या नक्षत्राचा पर्यायी वृक्ष 'रीठा' आहे. हा वृक्ष संपूर्ण भारतात सर्वत्र आढळतो. या नक्षत्राची आराध्य देवता "सूर्य" (सविता) आहे. 'सविता' ही एक स्वतंत्र देवता आहे. 'सविता' म्हणजे प्रेरणा, उद्दीपित करणे, चेतना देणे असा आहे. उदयापूर्वीचा आणि अस्तानंतरचा सूर्य म्हणजे "सविता" होय 'सविता' हा फार मोठ्या धनाचा स्वामी आहे. सोनेरी हातांचा, सोनेरी डोळ्यांचा आणि सोनेरी जिभेचा अशा वर्णनाची देवता म्हणजे 'सविता 'होय*

*या नक्षत्राच्या आकारांत पांच तारे आहेत. एका हाताच्या पंजा प्रमाणे 'हस्त 'चा आकार दिसतो. म्हणूनही ऋषी-मुनींनी या नक्षत्राला 'हस्त' हे नांव दिले आहे. या नक्षत्राचे चारही चरण कन्या राशीत येतात. या चारही-चरणांचे स्वामी अनुक्रमे मंगळ, शुक्र, बुध आणि चंद्र हे ग्रह आहे*

*या जातकांनी 'वास्तुशास्त्र पेंटींग' करून घेतल्यास त्यांना ट्रेडींग, दलाल, डाक-तार सेवा, पाण्याशी संबंधित वाहतूक, सूती उद्योग, पूल, बंधारे, सुरुंग निर्मिती, रंग-शाई निर्मिती, राजदूत, वकिली, आयात-निर्यातीचा व्यवसाय अशा विशेष व्यवसायांना मध्ये खूप आश्चर्यकारक सकारात्मक परिणाम मिळू शकतो.*

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




## जात्यावरच्या ओव्या......

शिवाराची वाट
काहून पायात गुतली ?
सईबाई सोबतीन
माझी माहेराला गेली ||२७३||

शिवाराची वाट
झाली आज जड
लेकी, सुना ,मामा घरी
एकलीची परवड ||२७४||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## मी कल्हईवाला बनतो...




ज्योतिर्मय साहित्य

(आता माझ्या डोक्यात प्रकाश पडला) मी म्हटले, अच्छा, असं होय. पण अहो मी तो लेख लिहिला आहे. मी कल्हईवाला नाही.

बरं, पण भेटला तर सांगा. नंबर द्या त्याचा किंवा भेटला तर पाठवून द्या.

मी म्हटलं, हो, हो अगदी नक्की...

परत दुसरा फोन अगदी तसाच. मला लोकांचं मोठं नवल वाटू लागलं. यांना एवढंही समजूही नये का की हा दिलेला नंबर लेखकाचा आहे म्हणून ! या सगळ्या धक्क्यातून सावरून मी बाहेर पडलो. आता प्रत्यक्ष पेपर पाहिल्याशिवाय काही लक्षात येणार नाही तेव्हा पेपर आणायचा म्हणून निघालो. घराच्या थोडेसेच पुढे गेलो. तो एका ए सी पी ऑफिसमधून फोन. मी अमुक अमुक पोलीस स्टेशनमधील हवालदार बोलतो आहे. पेपरमध्ये तुमचा लेख वाचला. त्याचे माझे झालेले संभाषण



तुम्ही कल्हई करता का ?

नाही. मी तो लेख लिहिला आहे.

मग तो कल्हईवाला तुमच्या ओळखीचा आहे का ?

नाही.

त्याचा नंबर आहे का ?

नाही.

कुठे राहतो ?

माहिती नाही.

तुम्हाला कसा आणि कुठे भेटला ?

अहो, तो दारावर आला होता. त्याच्याकडून माझ्या भांड्यांना कल्हई करून घेतली.

ठीक आहे. तो भेटला तर त्याचा नंबर घ्या. आम्हाला या नंबरवर कळवा. आम्हाला महत्वाचे काम आहे.

असे म्हणून हवालदार साहेबांनी फोन ठेवला. मी मात्र हवालदिल झालो. या महाशयांचे काय काम असावे कल्हईवाल्याकडे ? पोलीस स्टेशनमध्ये कधी तांब्यापितळेची भांडी पाहिल्याचे मला आठवत नाही. म्हटलं जाऊ द्या. आपल्याला काय करायचे ! नाहीतरी अलीकडे सगळ्याच गोष्टींना कल्हई करायची गरज आहे ! अशा प्रामाणिक विचारात रस्ता पार केला. पेपरवाल्याकडे आलो. त्याला म्हटलं, बाबा, अमुक अमुक पेपर आहे का?

आहे ना साहेब.

त्याला पुरवणी आहे का ? ( कधी कधी एखाद्या पेपरमध्ये त्यांचे पुरवणीचे पान टाकायचे राहून जाते )

आहे ना साहेब. त्याने पाहून खात्री केली. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## मुमुक्षुलक्षण


ज्योतिर्मय साहित्य

सत्कर्म करण्यासाठी काया,वाचा,मनाने कशाचीही झीज होऊ दिली नाही. परोपकार केला नाही. कामवासनेच्या मस्तीने चंचल स्वभाव आवरू शकलो नाही. भक्तिरूपी माऊलीला बुडवून टाकली,शांतिरूपी विश्रांती मोडून टाकली. भगवंता पर्यन्त पोहचवण्यासाठी ऊपयोगी पडणारीबुद्धि व वासना दोन्ही मी मूर्ख पणाने विकल व असमर्थ करून टाकली. अविचारा पगडा मनावर ऐवढा बसला होता की माझ्यापाशी विवेकऊरलाच नाही.लौकिक अर्थाने प्रपंचात पूरा बद्ध झालो. श्रद्धा, प्रेम माया ममत्व हे माझ्या मनात कधी ऊत्पन्न झालेच नाही. आतापर्यंत जे जे कर्म केले ते ते सर्व लौकिकात बरे दिसावे म्हणून केलेकर्माचा सगळा खटाटोप वरपांगी होता. तो एक प्रकारचा दंभाचार होता.

पोट भरण्यासाठी किर्तन केले. देव बाजारात मांडायला मागेपुढे बघितले नाही.त्यावर अनेक खोट्या थापा मारून पैसै मिळवले रंजल्या गांजल्यांना अडवणूक करून त्यांनाही त्रास दिला.माझी बुद्धी किती खोटी व पापी आहे. हे मी जाणतो. मनात अभिमान ठेवून बाहेर मात्र निरभिमानपणाच्या थापा मारीत राहिलो ,मनात पैशाची वासना ठेवून बाहेर मात्र परमेश्वराचे ध्यान लागले असल्याचे सोंग केले. शास्त्राचें पांडित्यज्ञान फक्त माझ्याकडे आहे असे सांगून लोकांना फसवले. ,केवळ पोटासाठी संतांची निंदाकेली. सत्याचा त्रागा केला. त्याचा नाश करण्याचा प्रयत्न केला. खोट्याचे सरळ सरळ प्रतिपादन केले. केवळ पोट भरण्यासाठी अशी निंदनीय दोष कर्मे केली.

अशाप्रकारे ज्याला खरा पश्चाताप होतो जो उपदेशाने आतबाहेर बदलतो त्यालाच समर्थ रामदास स्वामी मुमुक्षु म्हणतात.

## संत विषयात देव पाहतात, आपण देवात विषय पाहतो



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

प्रत्येकजण भक्ती करीतच असतो, कारण व्यापक दृष्टीने पाहिले तर भक्ती म्हणजे आवड. परमार्थात भक्ती म्हणजे परमात्म्याची आवड असा अर्थ आहे. सर्वांना विषयाची आवड असते, तेव्हा सर्व लोक एकपरीने विषयाची भक्तीच करीत असतात. विषयाची आवड ही देहबुद्धीला धरून, देहबुद्धी वाढविणारी, आणि स्वार्थी असते. ही कमी झाल्याशिवाय परमात्म्याची आवड म्हणजे भक्ती उपजणे शक्य नाही. याकरिता भक्तिमार्गातली पहिली पायरी म्हटली म्हणजे मोबदल्यारहित, निष्काम, नि:स्वार्थी परमात्मस्मरण करणे; आणि शेवटची पायरी म्हणजे आपण स्वत:ला विसरणे, देहबुद्धि विलगीत होणे, ही होय. देहरक्षण परमात्मप्राप्तीकरिता करावे. केवळ विषयसेवनाकरिताच जगणे असेल तर त्यापेक्षा मेलेले काय वाईट ?

जयंत्यादि उत्सव आपण करतो ते भगवंताच्या ठिकाणी प्रेम उत्पन्न व्हावे म्हणून. मुळात प्रेम नसेल तर, ज्याच्यावर प्रेम असते त्याला आपण जो उपचार करतो, तो उपचार करून प्रेम आणायचे असते. प्रेम आणि उपचार यांचा अन्योन्य संबंध असतो. या उपचाराने भगवंताशी संबंध वाढतो, आणि त्यामुळे भगवंतावरचे प्रेमही वाढते. आई आपल्या लहान मुलाला दागिने वगैरे घालते, त्याचे त्या लहान मुलाला काही सुख नसते, उलट थोडे दु:खच वाटते, पण त्यामुळे त्या आईला बरे वाटते म्हणून ती तसे करते. भगवंताला आपण दागिने वगैरे घातले तर ते स्वत:करिताच होय. वास्तविक भगवंताला काय कमी आहे ?

संत विषयात देव पाहतात, पण आम्ही मात्र देवातसुद्धा विषय पाहतो. रामाची मूर्ती काय उत्तम घडविली आहे, देऊळ किती सुंदर बांधले आहे, वगैरे आम्ही म्हणतो. आमची वृत्ती विषयाकार बनली, म्हणून आम्हाला जिकडेतिकडे विषयच दिसतो. संतांची वृत्ती राममयच असते, त्यांना सर्वत्र रामच दिसतो. तेरा कोटी जप केला म्हणजे रामदर्शन होते असे म्हणतात. त्याचा अर्थ, तेरा कोटी जप व्हायला रोज दहाबारा तास या प्रमाणात जवळजवळ बारा वर्षे लागतात, इतका सतत ध्यास लागला म्हणजे ते रूपच तो होतो. नाम कधीच वाया जात नाही. केव्हा केव्हा एखाद्याला दर्शन होत नाही, तेव्हा त्याचे नाम दुसरीकडे खर्च झाले असे समजावे; मग ते विषयप्राप्तीकरिता असेल, किंवा त्याचे पूर्वपाप घटत असेल. विषयाकरिता नाम खर्च करू नये, नामाकरिता नाम घ्यावे.

नाम आपले सर्वस्व वाटले पाहिजे.

## || संत महात्म्य ||

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## श्री ज्ञानेश्वरी निर्मितीचे प्रयोजन कोणते?

ज्योतिर्मय साहित्य

सात्विक बुद्धीत सुविचार सिद्ध होण्यासाठी विज्ञानी कर्माकडे कल असतो. सदबुद्धी मध्ये प्रज्ञा ऋतुंबरा प्रज्ञा निर्माण होते. विश्वरूपता येते. राग द्वेष संपलेले असतात. यश, अपयश यात मन आंदोलीत होत नाही. बुद्धीत समत्व आलेले असते. याशिवाय नखशिकांत अहं ब्रम्हास्मी (मीच ब्रह्म आहे) या सिद्धीचा अनुभव येतो. चराचरात ही तीच चैतन्य शक्ती विराजमान आहे हा अनुभवही यायला लागतो. विषयात वावरूनही विषयाची बाधा होत नाही.

असे सदबुद्धी असलेले सिद्ध पुरुष अनेको अनेक निर्माण व्हावेत. त्यांच्या प्रभावातून दृष्टांचा दुष्टपणा कमी व्हावा सर्व भूतमात्रात परस्परात स्नेह निर्माण व्हावा. ही मंगल कामना आणि तशी आग्रही मागणी भगवान श्री ज्ञानेश्वर महाराज यांनी आपली अनंत जन्माची तपसाधनेचे तेज पणाला लावून हे पसायदान मागून घेतलेले आहे. असे सुबुद्धी असलेले म्हणजेच बुद्धी योगी सिद्धपुरुष निर्माण होण्यासाठी त्यांना सिद्ध करून घेणारे, समर्थ सद्गुरु तितक्याच मोठ्या प्रमाणावर लागणार आहेत, म्हणून भगवंताला त्यांनी अशा सिद्ध पुरुषांचे जथेच्या जथे लोककल्याणासाठी आणि बुद्धी योगी सिद्ध पुरुष घडविण्यासाठी जनसामान्यात पाठवावेत ही आग्रहाची विनंती केली आहे. आणि तसा आदेश या महारावानी म्हणजेच ज्ञानेश्वर महाराजांनी इतर सिद्धांना दिला आहे. असे सिद्ध पुरुष निर्माण झाल्यानंतर त्यांच्या प्रभावाने राग द्वेष मोह अभिनिवेष हे क्लेश क्षिण होतील. आणि समाज सत्वगुण प्रधान व्हायला मदत होईल. म्हणजेच पर्यायाने या समाजाचे अध:पतनापासून रक्षण होईल.

आता आपणास कळाले असेल की ज्ञानेश्वर महाराज यांनी ही ज्ञानेश्वरी या जगताचे अध्यपतनापासून कसे रक्षण करील याचा वस्तू पाठ या ग्रंथातून दिला आहे.यात अनेक दिव्य प्रयोग दिले आहेत. साधकांनी ते प्रयोग स्वतःची पात्रता वाढवून आणि श्री गुरुच्या कृपेने मिळवायचे असतात. आणि पूर्णत्वास न्यायचे असतात.

अशा रीतीने ज्ञानेश्वरी हा ग्रंथ निश्चितच या कलि युगाला अध:पतनापासून वाचविणारा महान ठेवा आहे. यात किंचितही शंका नाही.

सिद्ध पुरुषांचे सामर्थ्य कसे असते हे जाणण्यासाठी नुकतेच आळंदी येथे केलेला एक प्रयोग लक्षात घेण्यासारखा आहे.

काही लोकांना असे अनुभवास आले की ज्ञानेश्वर माऊलीची समाधी असणाऱ्या आळंदीच्या परिसरात कितीही लोक येवोत त्यांच्यात सद्भाव, भक्ती जागृत होते. विकारांना थोडासा लगाम लागतो. हे याच क्षेत्रात आल्यावर कसे काय घडते ?हा प्रश्न पडला. काही लोकांनी वैज्ञानिक प्रयोग करून पहावे म्हणून अल्फा रेज चा संदेश टिपणारे उपकरण आणले आणि त्यांच्या हे लक्षात आले की, माऊली च्या समाधी स्थानापासून दहा किलोमीटर वर हवेत आणि २२ किलोमीटर रुंद परिसरात सर्वत्र अल्फा रे चा प्रभाव दिसून आला.

समाधी अवस्थेत जेव्हा योगी असतो ,तेव्हा ही दिव्य किरणे त्याच्या मस्तकातून बाहेर प्रस्फुटीत होत असतात,

आणि त्यांच्या संपर्कात जो कोणी येईल, त्याचा रजो गुण आणि तमोगुण कमी होऊन, सत्वगुण प्रभावशाली होऊ लागतो.

माऊली समाधीस्थ होऊन आज साडेसातशे वर्षे झाली. आजही इतक्या प्रचंड प्रमाणात अल्फा रे चा वर्षाव समाधी स्थानातून बाहेर पडतो आहे. तर ज्यावेळेस माऊली प्रत्यक्ष देहानीशी हजर होते, त्यावेळेस त्यांचा प्रभाव किती दूरपर्यंत जात असेल?ज्ञानेश्वरीत दिलेले दिव्य प्रयोग हे गुरूच्या मुखातून त्यांच्या आज्ञेने प्रत्येकाने कसोशीने करावेत व स्वतः विकसित होण्या सोबतच अवती भवतीचा संपूर्ण परिसर सत्व गुण प्रधान करून या देशाला सुजलाम सुफलाम करण्याकडे वळावे ही इच्छा व्यक्त करून हा भाग इथेच संपवितो.




## रक्ताभिसरण संस्थेचे शुद्धीकरण गरजेचे आहे, कारण...

ज्योतिर्मय साहित्य

१) जेवणाच्या लगेच आधी, जेवतांना मध्ये-मध्ये आणि जेवणानंतर लगेच पाणी प्यायचे नाही. कारण त्यामुळे जठराग्नी विझते, पाचक रस पातळ होतात त्यामुळे खाल्लेले अन्न पचत नाही. त्यामुळे जेवणाच्या किमान आर्धा तास आधी आणि जेवणानंतर एका तासानेच पाणी प्यावे.

२) पुरेसे आणि शिस्तबद्ध पद्धतीने पाणी प्यावे - पुरेसे म्हणजे २० किलो वजनाला १ लिटर पाणी लागते म्हणजेच ६० किलो वजन असेल तर ३ लिटर पाणी आवश्यक आहे, अती नको वा कमीही नको. शिस्तबद्ध पद्धतीने म्हणजे पाणी नेहमी बसून प्यावं, उभं राहून पिऊ नये. पाणी नेहमी ग्लास तोंडाला लावून प्यावं, वरुन पिऊ नये. आणि महत्वाचं म्हणजे पाणी चावून खावे म्हणजे गटागट न पिता जास्तीत जास्त लाळ मिसळून सावकाश पिलं पाहिजे कारण लाळ अल्कलाईन (क्षारीय) असते, ती दर मिनिटाला साधारण ०.५ बनत असते, ती जास्तीत जास्त पाण्यासोबत पोटात जाणे गरजेचे असते. कारण त्यामुळे पोटातील ॲसिडीक वातावरण नॉर्मल (सामान्य) व्हायला मदत होते आणि पोटातील ॲसिडीक वातावरण जेवढं नॉर्मल (सामान्य) होईल तेवढं वात-पित्त-कफ संतुलित राहून आपण निरोगी राहतो.

पाणी पुरेसे आणि शिस्तबद्ध पिण्यात आलं तरच किडनी ही गाळणी व्यवस्थितपणे शरीरशुद्धी करते.

३) जागरण टाळणे - रात्री १० च्या आत झोपलंच पाहिजे. कारण रात्री १० च्या आत झोपलं तरच आपण रात्री ११ ते ३ या वेळेत गाढ झोपेत असू आणि या वेळेत गाढ झोपेत असलो तरच यकृत () ही गाळणी व्यवस्थितपणे शरीरशुद्धी करते, अन्यथा शरीरशुद्धी व्यवस्थित होत नाही.

४) सुर्यास्तानंतर शक्य तितके लवकर जेवावे - सुर्यास्तानंतर आपली जठराग्नी शांत व्हायला लागते. त्यामुळे सुर्यास्तानंतर शक्य तितक्या लवकर जेवावे. खरं तर सुर्यास्तानंतर काहीच खाल्लं नाही पाहिजे. पण आपल्या लोकांचा स्वयंपाक लवकर होत नसल्याने सुर्यास्तानंतर किमान शक्य तितक्या लवकर तरी जेवावे.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

५) रात्री जेवलं की लगेच झोपणं टाळावे - जेवलं की लगेच झोपलं तर खाल्लेले पचत नाही आणि न पचलेलं सडून विषारी द्रव्ये (टोक्सिन्स) तयार होतात. त्यामुळे रात्रीचं जेवण आणि झोपणं यामध्ये २-३ तासांचे अंतर अवश्य असावे.

६) ताण-तणाव (स्ट्रेस) टाळावा - ताण-तणावांमुळे शरीरात रासायनिक प्रक्रिया घडून विषारी द्रव्ये तयार होतात. त्यामुळे ताण-तणाव नियंत्रित राहण्यासाठी नियमितपणे व्यायाम व ध्यान (मेडिटेशन) करावे.

७) विरुद्ध आहार टाळावा - विरुद्ध आहार शक्यतो दूध-दही याबाबतीत घडतो. जेवतांना दूधाची खिर खाऊ नये किंवा जेवणानंतर लगेच दूध पिऊ नये. कारण दूधात मीठ टाकलं तर दूध नासते, मग जेवणात मीठ असतेच त्यामुळे जेवतांना किंवा जेवणानंतर लगेच दूध पिलं तर दूध नासण्याची प्रक्रिया पोटात चालू होते आणि त्यामुळे पोटात रासायनिक प्रक्रिया घडून विषारी द्रव्ये तयार होतात म्हणून याला विरुद्ध आहार म्हणतात.

तसेच दही रात्री खाणंही विरुद्ध आहार आहे कारण दही पचवण्यासाठीचे पाचक रस (एंझ्याम्स) आपल्या शरीरात दुपारीच बनत असतात त्यामुळे दही दुपारीच खावे. रात्री दही पचवण्यासाठीचे पाचक रस (एंझ्याम्स) बनत नसल्यामुळे रात्री दही पचत नाही उलट सडून विषारी द्रव्ये तयार होतात त्यामुळे याला विरुद्ध आहार मानलं जातं.

## || निरूपण ||



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

ते कारणाद् जगत् सर्वं भासते दृष्यते ननु।
तवाश्रितं कृरूश्वाम्ब शिशुं पालय तारय।।७९।।

खरोखर तुझ्यामुळेच सर्व जग भासते, दिसते. माते, तुझ्या आश्रित कर. आपल्या लेकराचे पालन व रक्षण कर.

एकवीरे त्वमेकैव दयावती कृपावती।
तत्त्वमन्यन्न जानामि शिशुं पालय तारय।।८०।।

एकवीरे, तू एकच दयावती, कृपावती आहेस. मी अन्य तत्त्व जाणत नाही. आपल्या लेकराचे पालन व रक्षण कर.

तवाधारेण जीवामि चलामि च चरामि च।
तवाधारं विना शून्यं शिशुं पालय तारय।।८१।।

तुझ्या आधाराने जगतो, चालतो, वर्तन करतो. तुझ्या आधराविना सर्व काही शून्य आहे. आपल्या लेकराचे पालन व रक्षण कर.

नम्रता विनयश्चापिशरण्यता सदास्तु मे।
ते पादयुगले ध्यानं शिशुं पालय तारय।।८२।।

माझ्याकडे सदा नम्रता, विनय आणिशरण्यता असावी. तुझ्या चरणयुगली ध्यान असावे. आपल्या लेकराचे पालन व रक्षण कर.

## ||श्री राम कथा||





वक्ते: आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

तर राम मला मारणार नाही .आणि मी आजवर इतकी पापे केली आहेत की मला मुक्ती मिळण्यासाठी प्रभू रामचंद्राच्या हस्ते मृत्यूच यायला हवा. त्यावर मंदोदरी म्हणते अहो तुम्हाला लढून जर मृत्यू येणार असेल आणि असाच मृत्यू तुम्हाला हवा असेल तर राम हा क्षत्रिय आहे त्यास तुम्ही नुसते आव्हान केले असते तरी ते तुमच्याशी युद्ध करायला तयार झाले असते. रावण म्हणतो मी असे केले असते तर कदाचित तर मला एकट्याला मृत्यू येऊन, मोक्ष मिळाला असता. पण माझी ही जी राक्षसांची फौज आहे या सर्वांना मुक्ती मिळण्यासाठी कोणता उपाय आहे ?म्हणून मी सीतेला पळवून आणली आहे.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

विरोधासक् ची ही कथा एका रामायणात आहे.

रावणाच्या हेरांनी वानराचे वृत्त सांगितले.राम स सैन्य लंकेत आले.सीतेला त्रिजटेने राम आल्याचे सांगितले.

आजवर रावणाने प्रलोभने दाखविली,भीती दाखविली,मायेने प्रभू राम व लक्ष्मण यांची मुंडकी तबकात ठेऊन सीतेला दाखविली.तरी सितेवर परिणाम का होत नाही? कारण ती पतिव्रता आहे. आपण तर या बाबतीत कुठेच बसत नाही. म्हणून त्याने मंदोदरीला (ती पतिव्रता होती म्हणून) सीतेला समजवायला पाठविले. कोण्या स्त्रीला दुसरी सवत आवडेल?

**(क्रमशः)**

# समाधान हाच यशाचा शाश्वत मार्ग-डॉ.मुलमुले





**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** भानुदास चव्हाण सभागृहात संवाद सेतू प्रतिष्ठान आयोजित व्याख्यानातून प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार मुलमुले यांनी यशाची विविध समाजमान्य परिमाण सांगत खरं समाधान देणार यश कोणतं हे मार्मिक शैलीत क्वचित कोपरखळ्या मारत सांगताना गाणी, शेरोशायरीची पाखरण करत श्रोत्यांच्या मनाची पकड घेतली. बाहेरून मिळतो तो आनंद आणि आतून येतं ते समाधान असं सांगत त्यांनी श्रोत्यांना छोट्या- छोट्या टिप्स देखील दिल्या.

समाधान हाच यशाचा शाश्वत मार्ग आहे, हा मूलमंत्र मुलमुले यांनी उपस्थितांना दिला. आयुष्याचे उद्दिष्ट हे सुख ,आनंद व समाधान मिळवणे हे असते. स्वीकार करा : आयुष्यात येणाऱ्या बऱ्या-वाईट गोष्टींचा तसेच सर्वतऱ्हेच्या व्यक्तींचा विनातक्रार आहे तसा स्वीकार करा. प्रतिक्रिया नको प्रतिसाद द्या : प्रतिक्रिया देताना माणूस त्याच तीव्रतेने व्यक्त होतो याउलट प्रतिसाद देताना समोरची व्यक्ती अथवा घटना याविषयी मनात एक कुतूहल जागृत होते. त्याचा संयम प्रतिसादात रूपांतरित होतो आणि संभाव्य संघर्ष टाळतात. क्षमाशीलता : क्षमा मागणं आणि क्षमा करणं ही फार मोठी गोष्ट आहे जी माणसाला समाधानी बनवते. आनंदी खेळकर वृत्ती : आयुष्यात कितीही संकटे आली तरी हसत–खेळत तोंड देणारी व्यक्ती समाधानी राहते. विनोद माणसाच्या मनातील उदासलेपण झटकून संकटांचा सामना करण्याची हिम्मत देतो. निरपेक्ष भावनेने देण्याची कुठलीही कृती नेहमी समाधान देणारी असते, असे जगण्याचे तत्वज्ञान डॉ. मुलमुले यांनी सोदाहरण स्पष्ट केले. अनुभवसिद्ध चिंतनशील विचार ऐकण्यासाठी नागरिकांनी गर्दी उसळली होती.

दीप प्रज्वलाने सुरुवात झाली. पाहुण्यांचा परिचय डॉ. सुनिता डोळीबळे यांनी केला. संस्थेच्या उपाध्यक्ष साधना सुरडकर यांनी डॉ. मुलमुले यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला .संस्थेचा परिचय अनघा महाजन यांनी करून दिला तर आभार सविता देव यांनी मानले. सूत्रसंचालन अर्चना नरसापूर यांनी केले. सत्यप्रभा अष्टपुत्रे, सुनीता पिंपरीकर, डॉ. सुनंदा कुलकर्णी, माधुरी धोंड, मनीषा कोकीळ , सीमा रामदासी, पूर्णिमा देशपांडे, शीला संचेती, संपदा निधोनकर, मेधा देशपांडे, आरती राळेगणकर, निवेदिता डंबारे, डॉ. स्मिता भागवत, मानसी फडके, कल्पना देशपांडे, भावना वैद्य ,उषा गणाचार्य आदींनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

## गँगस्टर लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

**ज्योतिर्मय साहित्य**




बाबू बँड बाजा या चित्रपटासाठी दिग्दर्शक राजेश पिंजानी यांनी राष्ट्रीय पुरस्कार पटकावला होता. मात्र त्यांचे अलीकडेच अकाली निधन झाले. त्यांनी दिग्दर्शित केलेला शेवटचा चित्रपट गोट्या गँगस्टर आता प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. चित्रपटाचा ॲनिमेटेड टीजर लाँच करण्यात आला असून, लवकरच हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

अन्नपूर्णा प्रॉडक्शन्स निर्मित गोट्या गँगस्टर या चित्रपटाची निर्मिती अन्नपूर्णा बिरादार, राजेश्री बिरादार, संदीप बिरादार आहेत, तर चित्रपटाची प्रस्तुती व सह निर्माते ऋतुजा पाटील, शिव लोखंडे यांनी केली आहे. राजेश पिंजानी यांनी लेखन दिग्दर्शन केलेल्या या चित्रपटात उत्तम स्टारकास्ट पाहायला मिळणार आहे. प्रवीण तरडे, प्रथमेश परब, डॉ. मोहन आगाशे, श्रीकांत यादव, अश्विनी गिरी, भूषण मंजुळे, विनोद वणवे, ऐश्वर्या शिंदे यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत.

मायानगरी मुंबईतील एका चाळीत राहणाऱ्या तीन मित्रांची गोष्ट गोट्या गँगस्टर या चित्रपटांतून उलगडणार आहे.

आयुष्यात घडणाऱ्या काही घटनांमुळे त्या तिघांवर

किडनॅपिंग करण्याची वेळ येते. त्या दरम्यान, काही वर्षांपूर्वी मुंबई सोडून थेट दुबईला पळून गेलेला डॉन चिमण भाई अचानक मुंबईत परततो. आणि त्या नंतर सुरू होतात विनोदी प्रसंग, भन्नाट संवाद आणि न संपणारी धमाल... त्यामुळे मनोरंजक कथानक, खुसखुशीत संवाद, दमदार दिग्दर्शन, उत्तम अभिनयाची मेजवानी या चित्रपटातून मिळणार आहे. महत्त्वाचं म्हणजे, बाबू बँड बाजासारखा कसदार चित्रपट केलेल्या राजेश पिंजानी यांच्यासहृदय दिग्दर्शक कलावंताची कलाकृती पडद्यावर येणार आहे.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते ७१ वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान

**ज्योतिर्मय साहित्य**

**नवी दिल्ली –** भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मान मानल्या जाणाऱ्या ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचे वितरण विज्ञान भवन येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते करण्यात आले. या मल्याळम सुपरस्टार मोहनलाल यांना 'दादासाहेब फाळके जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले .या सोहळ्यात मराठी चित्रपटांनी आपली गुणवत्ता आणि वैविध्य सिद्ध करत राष्ट्रीय पातळीवर आपली छाप पाडली. 'शामची आई', 'नाळ २' आणि 'जिप्सी' या चित्रपटांनी मराठी सिनेमाची श्रीमंती अधोरेखित करत विविध श्रेणींमध्ये पुरस्कार पटकावले. वर्ष २०२३ मधील उत्कृष्ट चित्रपट आणि कलाकारांना सन्मानित करण्यात आले.

या केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, , माहिती व प्रसारण विभागाचे सचिव संजय जाजू आणि निवड समितीचे सदस्य आशुतोष गोवारीकर, पी.शेषाद्री, गोपालकृष्ण पाय व्यासपीठावर उपस्थित होते.




मल्याळम चित्रपटसृष्टीचे दिग्गज अभिनेते मोहनलाल यांना भारतीय चित्रपट क्षेत्रातील सर्वोच्च सन्मान, दादासाहेब फाळके पुरस्कार २०२३, ७१व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. चार दशकांहून अधिक काळ ४०० पेक्षा जास्त चित्रपटांमध्ये अभिनय, दिग्दर्शन आणि निर्मितीच्या माध्यमातून भारतीय सिनेमाला समृद्ध करणाऱ्या मोहनलाल यांच्या अप्रतिम योगदानाचा यानिमित्ताने गौरव झाला. मल्याळमसह तेलुगू, तमिळ, कन्नड आणि हिंदी चित्रपटांमध्ये त्यांनी साकारलेल्या वैविध्यपूर्ण भूमिका आणि रंगभूमीवरील उत्कृष्ट कामगिरीने त्यांनी प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान मिळवले आहे.

यापूर्वी २००१ मध्ये पद्मश्री आणि २०१९ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित मोहनलाल यांचा हा सन्मान त्यांच्या प्रेरणादायी कारकिर्दीतील आणखी एक सुवर्ण अध्याय आहे. त्यांचा हा वारसा भावी पिढ्यांना प्रेरणा देत राहील.

शामची आई': साने गुरुजींच्या अजरामर साहित्यकृतीवर आधारित 'शामची आई' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा रजत कमळ चा पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार चित्रपटाचे निर्माते अमृता अरुण राव व दिग्दर्शक सुजय डहाके यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते स्वीकारला.

सुजय डहाके यांनी दिग्दर्शित केलेला आणि मराठी चित्रपट मंडळ तसेच साहित्य संमेलन प्रॉडक्शन्स यांनी निर्मित केलेला हा चित्रपट शाम नावाच्या मुलाच्या दृष्टिकोनातून त्याच्या आईच्या प्रेम, त्याग आणि शिक्षणाची भावनिक कहाणी सांगतो. चित्रपटात संदीप पाठक, गौरी देशपांडे, ओम भूतकर, शर्व गाडगीळ, सारंग साठ्ये, मयुर मोरे, ज्योती चांदेकर आणि सुनील अभ्यंकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. साध्या पण प्रभावी कथानकातून प्रेक्षकांना भावनिक प्रवासात गुंतवणारा हा चित्रपट मराठी साहित्याचा सिनेमातील यशस्वी प्रवास दर्शवतो. समीक्षकांनी चित्रपटाच्या सौंदर्यशास्त्र आणि अभिनयाचे विशेष कौतुक केले आहे. 'नाळ २': २०१८ च्या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या 'नाळ' चित्रपटाचा सिक्वेल असलेल्या 'नाळ २' ने दुहेरी यश मिळवले. आटपाट प्रॉडक्शन आणि झी स्टुडिओज यांनी निर्मित, सुधाकर रेड्डी यक्कांती यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट बालचित्रपटाचा सुवर्ण कमळ चा पुरस्कार मिळाला. हा पुरस्कारआटपाट प्रॉडक्शन आणि झी स्टुडिओज यांच्यावतीने विजयकुमार बन्सल यांनी व चित्रपटाचे दिग्दर्शक सुधाकर रेड्डी यक्कांती यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते स्वीकारला.


चैत्या नावाच्या मुलाच्या भावनिक प्रवासाचा पुढील टप्पा दाखवणारा हा चित्रपट आपल्या खऱ्या आईला भेटण्यासाठी गावी गेलेल्या चैत्याला आपली बहीण आणि भाऊ असल्याचे कळण्याची कहाणी सांगतो.

याच चित्रपटातील त्रिशा ठोसर, श्रीनिवास पोकले आणि भार्गव जगताप यांना संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट मराठी बालकलाकार पुरस्कार मिळाला, त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते स्वीकारला. वऱ्हाडी बोली, ग्रामीण महाराष्ट्राचे नयनरम्य चित्रण आणि आई–मुलाच्या नात्यातील संवेदनशील चित्रण यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांचा लाडका ठरला. 'भिंगोरी' आणि 'डराव डराव' ही गाणी विशेष लोकप्रिय झाली.










## वाघिरे महाविद्यालयाचे कुस्ती स्पर्धेत घवघवीत यश

**ज्योतिर्मय साहित्य**




सासवड : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीतर्फे मु.सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघिरे महाविद्यालय, सासवड येथील खेळाडूंनी तीन सुवर्ण व तीन रौप्य पदक पटकावून दैदिप्यमान कामगिरी केली.

फ्री स्टाईल कुस्ती प्रकार

६१ किलोग्रॅम वजनगट : श्रीनाथ डांगे
– सुवर्णपदक,

७४ किलोग्रॅम वजनगट: प्रकाश कार्ले
– सुवर्णपदक,

९७ किलोग्रॅम वजनगट: प्रतीक जगताप
– सुवर्णपदक,

९२ किलोग्रॅम वजनगट: यशराज काळे
– रौप्यपदक

ग्रीकोरोमन कुस्ती प्रकार ८२ किलोग्रॅम वजनगट: अजिंक्य शिंदे – रौप्य पदक,

९७ किलोग्रॅम वजनगट: विशाल जाधव
– रौप्यपदक

वरील सर्व खेळाडूंची बारामती येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सदर घवघवीत यशाबद्दल खेळाडूंचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पंडित शेळके, उपप्राचार्य डॉ.बी.यु.माने, डॉ. संजय झगडे, शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा. प्रितम ओव्हाळ यांनी अभिनंदन केले. सर्व विजेते खेळाडू श्री शिवाजी प्रसारक मंडळ, सासवड संचलित छत्रपती शिवाजी कुस्ती संकुल येथे प्रशिक्षक पै.तानाजी बोडरे व पै.माऊली खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहेत.



# या देवी सर्वभूतेषु शक्ति-रूपेण संस्थिता।
# नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।



## अन्नपूर्णे सदापूर्णे शंकर प्राण वल्लभे, ज्ञान वैराग्य सिद्ध्यर्थं भिक्षां देहि च पार्वति

**ज्योतिर्मय साहित्य**

अन्नपूर्णा देवी संदर्भात एक आख्यायिका सांगितली जाते. अन्नाचे महत्त्व भगवान शंकराला मान्य नव्हते. शंकर म्हणाला की प्रत्येक भौतिक गोष्ट म्हणजे एक आभास आहे, अगदी मानव खातात ते अन्नसुद्धा. दोघांच्या मध्ये वाद झाला,त्यानंतर पार्वती रुसून निघून गेली. भगवान शंकराला आणि संपूर्ण जगाला आपले महत्त्व दाखवण्यासाठी पार्वती गुप्त झाली होती माझ्याशिवाय जग कसे टीकाव धरतात आहे हेच मला आता बघायचे आहे.

पार्वती म्हणजे प्रत्यक्ष अन्नपुर्णाच. आता अन्नपूर्णाच निघून गेल्यामुळे जगात सर्वत्र हाहा:कार माजला. अन्न नसल्यामुळे लोकांचे हाल सुरू झाले.

शेवटी पार्वतीलाच दया आली आणि ती अन्नपूर्णे च्या रुपात एका मंदिरात काशीला अवतीर्ण झाली. तिने अन्नदान सुरू केले. भगवान श्रीशंकरालाही मधली सगळी परिस्थिती अनुभवाला आल्यामुळे अन्नाचे महत्त्व समजले आणि ते स्वतः पार्वतीकडे भिक्षा मागायला आले. अन्नपूर्णेचे पहिले मंदिर त्यामुळेच काशीला आहे. अन्नपूर्णा रुपाच्या उत्पत्तीबद्दल आणखी एक कथा सांगितली जाते. भगवान शिव शंकर भिक्षेला गेलेला असताना एके दिवशी त्यांना भिक्षाच मिळाली नाही. अर्थात, तसे घडावे ही नारदमुनींनी केलेली योजना होती. नंतर पार्वतीने स्वादिष्ट अन्न वाढून शंकरांना तृप्त केले. त्यामुळे प्रसन्न झालेल्या शिवांनी पार्वतीला तू अन्नपूर्णा असा आशिर्वाद दिला.




आपल्या देव्हाऱ्यात अन्नपूर्णे ची मूर्ती असते.. हातात पळी घेवून असणारी ही देवी म्हणजे पार्वती माता होय. संपूर्ण विश्वाला अन्न पुरविण्याचे कार्य अन्नपूर्णा देवी करते. म्हणून दररोज घराघरात तिची पूजा केली जाते. आदी शंकराचार्यांचे अन्नपूर्णास्तोत्र आपण वाचत असतो. त्यात अन्नपूर्णा मातेचे सुंदर आणि अर्थपूर्ण वर्णन केलेले आहे. महाराष्ट्रात विवाहाच्या आधी वधू गौरीहार पूजन करते. त्यावेळी अन्नपूर्णा मातेच्या पितळी किंवा चांदीच्या छोट्या मूर्तीची पूजा करून वधू सौभाग्यासाठी प्रार्थना करते. लग्न झाल्यावर मुलीला सासरी पाठवताना अन्नपूर्णेची मूर्ती देतात. त्यामागे हा हेतू असतो की मुलीने अन्नपूर्णे ची पूजा करावी, प्रार्थना करावी, 'हे अन्नपूर्णे माझ्यावर प्रसन्न हो. मी जो स्वयंपाक करते, त्यास रुची येऊ दे. मी अत्यंत मन लावून, सुंदर भावनेने अन्न बनविले आहे, त्यात सात्विकता येऊ दे. ते खाऊन सर्व तृप्त होऊ देत. माझ्या मनात मातृभाव जागा होवो. आसपास कोणीही उपाशी राहणार नाही, याची मी काळजी घेवो. भुकेल्याला अन्न देण्याचा भाव माझ्या मनी जागो.' म्हणजेच काय तर तिने अन्नपूर्णेची सेवा, उपासना करून, उत्तम अन्न कुटुंबियांना खायला घालून कुटुंब सुखी करावे अशी अपेक्षा त्यामागे असते.

आदि शंकराचार्य अन्नपूर्णा स्तोत्रात म्हणतात, भिक्षां देही कृपावलम्बनकरि, मातान्नपूर्णेश्वरी''... म्हणजे कृपेचा आधार देणाऱ्या हे माते अन्नपूर्णे, तू मला भिक्षा घाल अशा शब्दांनी या स्तोत्रातील प्रत्येक विचाराचा किंवा श्लोकाचा अंतिम भाग आढळतो. ही भिक्षा अन्नाची आहे तसेच ज्ञान वैराग्याच्या सिद्धीसाठीही आहे कारण सुयोग्य अन्न शरीराला मिळाल्यानंतर पुढील ध्येये उत्तम आणि बौद्धिक पद्धतीत पार पडते. जीवनात अन्नाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. समस्त प्राणीमात्र अन्नाशिवाय जगू शकत नाहीत. अन्न शरीराला शक्ती पुरवते आणि जीवनाची नवी उमेद सतत देत राहते. अन्न खाल्ले की शरीराला एक प्रकारचे समाधान मिळते. म्हणूनच अन्नदानाला अनन्यसाधारण महत्त्व दिले गेले आहे. सर्वात श्रेष्ठ दान म्हणून अन्नदानाकडे पाहिलं जातं. आपल्याला कर्णाची गोष्ट माहिती आहेका.? कर्ण हा दानशूर होता पण त्याने अन्नदान केलं नाही म्हणून मृत्यूनंतर पुन्हा त्याला भूलोकी येवून अन्नदान करावे लागले असे सांगितले जाते.

जी महिला अन्न बनविते आहे तिचे समाधानी असले पाहिजे.शांत असायला हवे. तिने ते अन्न समाधानाने बनवले असले पाहिजे. तुम्ही पाहिलं असेल अन्नपदार्थ एकच असतो पण वेगवेगळ्या लोकांनी बनवला तर त्या अन्नाची चव वेगवेगळी असते. याचे कारणच हे की अन्न बनवणाऱ्याच्या वासना आणि मनस्थिती त्या अन्नात उतरत असते. म्हणून घरच्या अन्नपूर्णेला नेहमी समाधानात ठेवले गेले पाहिजे. असं म्हणतात तुम्ही जर मनापासून अन्नपूर्णेची उपासना केली तर तुमच्या हातून तयार होणाऱ्या पाककृती उत्तमच असतील. उत्तम अन्न हे शरीराला समाधान प्राप्त करून देते. शुचिर्भूत होऊन आनंदी वृत्तीने स्वयंपाक करण्याची आवश्यकता आहे आणि ते वातावरण घरातल्या सर्व लोकांनी निर्माण करून द्यावे. त्या अन्नात प्रेम असते. म्हणूनच आईच्या हातचे अन्न आपल्याला सगळ्यात गोड वाटते. केलेला स्वयंपाक हा आपण प्रत्यक्ष परमेश्वरासाठी करतो ही भावना करून जर केला तर तो अतिशय उत्तम होतो. म्हणूनच नैवेद्याचे अन्न हे अतिशय चविष्ट असते. म्हणूनच सत्यनारायणाला केलेला प्रसाद आणि शिरा यात फरक जाणवतो.

जा मी नाही जेवत किंवा मला नको ते जेवण असे म्हणून अन्नाचे ताट कधी दूर सारू नये. म्हणूनच जुनी वडिलधारी माणसे सांगतात जेवणावर कधी राग काढू नये तो अन्नपूर्णेचा अपमान असतो. ज्या घरात अन्नाची नासाडी होते तिथे अन्नपूर्णा नाराज होते. म्हणून अन्नाची नासाडी करू नका. आज अनेक शहरांमध्ये लग्नसमारंभात लग्नकार्यालयामध्ये, पार्ट्यांमध्ये अन्नाची खूप नासाडी होते. अन्नाचे महत्त्व जाणतात त्या काही स्वयंसेवी संस्था अशा ठिकाणचे उरलेले चांगले अन्न स्वेच्छेने स्वखर्चाने ज्यांना अन्नाची आवश्यकता आहे त्यांना पोहोचते करण्याचे खूप महत्त्वाचे काम करून खरोखरच अन्नपूर्णा मातेचा आशीर्वाद घेत आहेत. खरंतर अन्नाचे महत्त्व जाणून घेता अशा प्रकारे अन्नाची नाचणी होईल अशा प्रकारची कृती कुठल्याही कार्यक्रमात व्हायला नको हे तेवढे महत्त्वाचे आहे.

''उतू नका, मातू नका, अन्नाची नासाडी करू नका'' अन्न पायदळी तुडवू नका असे केले तर अन्नपूर्णे ची कृपा सदैव आपल्यावर राहिलं.

आधी शंकराचार्याने रचलेले अन्नपूर्णा स्तोत्र सोबत दिले आहे अनेक घरांमध्ये महिला हे स्तोत्र स्वतः म्हणत किंवा लावून ऐकता ऐकता स्वयंपाक करत असतात त्या अन्नात एक प्रकारे सात्विकता येते आणि असे अन्न आपल्या घरातील सर्व कुटुंबाला मिळायला हवे आज त्या मागचा उद्देश असतो.

**।। अन्नपूर्णा माता स्तोत्रम् ।।**



नित्यानन्दकरी वराभयकरी सौन्दर्यरत्नाकरी
निर्धूताखिलघोरपावनकरी प्रत्यक्षमाहेश्वरी।
प्रालेयाचलवंशपावनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।१।।
नानारत्नविचित्रभूषणकरी हेमाम्बराडम्बरी
मुक्ताहारविलम्बमान-विलसद्वक्षोजकुम्भान्तरी।
काश्मीरागरुवासिताङ्गरुचिरे काशीपुराधीश्वर
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।२।।
योगानन्दकरी रिपुक्षयकरी धर्मार्थनिष्ठाकरी
चन्द्रार्कानलभासमानलहरी त्रैलोक्यरक्षाकरी।
सर्वैश्वर्यसमस्तवाञ्छितकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।३।।
कैलासाचलकन्दरालयकरी गौरी उमा शङ्करी
कौमारी निगमार्थगोचरकरी ओङ्कारबीजाक्षरी।
मोक्षद्वारकपाटपाटनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।४।।
दृश्यादृश्यविभूतिवाहनकरी ब्रह्माण्डभाण्डोदरी
लीलानाटकसूत्रभेदनकरी विज्ञानदीपाङ्कुरी।
श्रीविश्वेशमनःप्रसादनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।५।।
उर्वीसर्वजनेश्वरी भगवती मातान्नपूर्णेश्वरी
वेणीनीलसमानकुन्तलहरी नित्यान्नदानेश्वरी।
सर्वानन्दकरी सदा शुभकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।६।।
आदिक्षान्तसमस्तवर्णनकरी शम्भोस्त्रिभावाकरी
काश्मीरात्रिजलेश्वरी त्रिलहरी नित्याङ्करा शर्वरी।
कामाकाङ्क्षकरी जनोदयकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।७।।
देवी सर्वविचित्ररत्नरचिता दाक्षायणी सुन्दरी
वामं स्वादुपयोधरप्रियकरी सौभाग्यमाहेश्वरी।
भक्ताभीष्टकरी सदा शुभकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।८।।
चन्द्रार्कानलकोटिकोटिसदृशा चन्द्रांशुबिम्बाधरी
चन्द्रार्काग्निसमानकुन्तलधरी चन्द्रार्कवर्णेश्वरी।
मालापुस्तकपाशसाङ्कुशधरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।९।।
क्षेत्रत्राणकरी महाऽभयकरी माता कृपासागरी
साक्षान्मोक्षकरी सदा शिवकरी विश्वेश्वर श्रीधरी।
दक्षाक्रन्दकरी निरामयकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।१०।।
अन्नपूर्णे सदापूर्णे शङ्करप्राणवल्लभे।
ज्ञानवैराग्यसिद्ध्यर्थं भिक्षां देहि च पार्वति।।११।।
माता च पार्वती देवी पिता देवो महेश्वरः।
बान्धवाः शिवभक्ताश्च स्वदेशो भुवनत्रयम्।।१२।।
।। इति श्रीमच्छङ्कराचार्यविरचितं
श्रीअन्नपूर्णास्तोत्रं सम्पूर्णम् ।।

## पाचवी माळ

**ज्योतिर्मय साहित्य**



नमस्कार

शारदा म्हणजे मूळमाया,मूळमायेचे जे शक्तिवर्धक अंग आहे तिच्या मध्ये सत्व, रज, तम हे तीन गुण आणि पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश ही पंचमहाभूते सुक्ष्म रूपाने वास करत असतात.

त्यालाच अष्ट्याप्रकृती किंवा गुणक्षोभिणी म्हणतात.

देवी शारदेला ''गुणक्षोभिणी'' हे नाव किती सार्थ आहे .

जिच्या हाती, परशु, अक्षमाला, रत्नजडित गदा, कमळ पुष्प, वज्र, धनुष्य, दण्ड, निरनिराळ्या शक्ति, चर्मढाल, शंख, घंटा, शिळ, फास ही आयुधे शत्रुच्या झुंजीसाठी आहेत. लढण्यासाठी सज्ज आहेत.

ती सुदर्शना तर आहेच. पण चेह-यावर मोहक व सुप्रसन्न भावही आहेत.

अशा या महिषासुरमर्दिनी, महालक्ष्मी, कमलवासिनीला माझा सतत नमस्कार असो.

देवी कथा - शेकडो वर्षांपूर्वी देव दानवांच्यात युध्द झाले.त्यात देवांच्या बाजूने देवांचा राजा इंद्र आणि राक्षसांच्या बाजूने राजा महिषासुर होता. तो राक्षस होता अत्यंत क्रुर होता. त्याने सर्वांना अतोनात त्रास दिला.

या युध्दात असुरांच्या महाप्रतापी वीरांनी देवसेनेचा पराभव केला. देवांना पूर्णपणे जिंकून इंद्राचे इंद्रपदही

हिसकावून घेतलं आणि महिषासुर इंद्रपदी बसला. इंद्राच्या सिंहासनावर महिषासुर राक्षस बसला. कल्पना करा देवाच इंद्रपद राक्षसाच्या हाती.

सौ.ऊज्वला धर्माधिकारी
पुणे

या राक्षसांनी देवांचा ही पराभव केला तर तुमच्या आमच्या सारख्यांची काय अवस्था असेल विचार करा?

या महिशासुर राक्षसाच्या त्रासाला सतत सामोरं जावं लागतं होतं. देवांनी राक्षसाचा बीमोड करण्यासाठी सर्व शस्त्र वापरले, प्रत्यक्ष परमेश्वरचं ते समाजाचा विचार आधी करणार ना !

देवचं ते फक्त आपलाचं विचार करणारं का? त्यांना पृथ्वी लोकांची काळजी असणारं ना !

देव पृथ्वीवरच्या लोकांच्या रक्षणाचा विचार करून कमलनिवासी ब्रम्हदेवांकडे गेले त्यांनी ब्रम्हदेवाला गरूड वाहनांवर आरूढ होणाऱ्या विष्णुकडे नेण्याची विनंती केली.

युध्दात घडलेल्या सर्व घटना म्हणजे देवांचा पराभव व महिषासुराच्या विजयाची बातमी देवांनी ब्रम्हदेवांना व भगवान विष्णुना सांगितली.

आपल्यावर झालेल्या अन्यायाची बातमी त्यांनी भगवान विष्णुंना सांगितली.

इंद्र, सुर्य, चंद्र, अग्नी, यम, वरूण यांचे अधिकार काढून घेऊन रिकाम्या जागेवर परस्पर आपल्या मर्जीतील अधिका-यांना बसवले. त्यांची नेमणूक करण्यात आली.

बोलून चालून राक्षसचं ते सर्व सामान्यांना अजून त्रास देऊ लागले.महिला, नुकतेच जन्मलेले अर्भक, वृध्द, तरूण कुणाचीही राक्षस पर्वा करत नव्हते. अगदी उच्छाद मांडलेला होता.एवढा ते त्रास देत होते.

पराजयाने विषण्ण झालेले देवगण स्वर्गातून महिषासुराने हाकलून दिल्याने मानवा प्रमाणे पृथ्वीवर सगळीकडे भटकू लागले.

दैत्यांनी केलेली आमची दुर्दशा आम्ही आपल्याला सांगितली, आम्ही शरण आलो आहोत.आता महिषासुराचा पराभव करून त्याला नष्ट करा, काहीतरी मार्ग काढा.

देवांचे हे गा-हाणे ऐकून मधूराक्षसाला (जो सर्वात दुष्ट राक्षस) ठार मारणारे सर्वात बलवान श्री विष्णु व भगवान शंकर अतिशय संतापले, अत्यंत रागाने त्यांच्या भुवया वक्र झाल्या. मुख क्रोधाने लालेलाल झाले. हाताच्या मुठी आवळल्या गेल्या.

अतिशय रागाने संतप्त झालेल्या चक्रधारी श्री विष्णुंच्या मुखातून एक महान तेज बाहेर पडले, तसेच तेज ब्रम्हा आणि शिवशंकरांच्या मुखातून ही बाहेर पडले, इंद्र व अन्य देवांच्या मुखातूनही आणि शरीरातून असेच विलक्षण तेज बाहेर पडले.

यासर्व तेजशलाका एकत्रित होऊन, त्यासर्वांचे एक महातेज निर्माण झाले. आणि काय आश्चर्य पहाता पहाता या देवतांचा, एक तेजस्वी ज्वालापर्वत तयार झाला.व त्या तेजाने दाही दिशातील परिसर व्यापून टाकला.

सर्व देवांच्या शरीरातून निर्माण झालेल्या त्या तेजाशी कशाचीच तुलना होत नव्हती.

मात्र सर्व तेजरेखा एकमेकांत मिसळण्याचे कार्य संपुष्टात आल्यानंतर एका नारी स्वरूपाचा आकार तयार झाला. त्या आकाराने तिन्ही लोक आपल्या तेजाने व्यापून टाकले.

भगवान शिवशंकरांच्या तेजाने मुखाचा एक अप्रतिम आकार घेतला. यमतेजाने लांबसडक व काळ्याभोर केसांचा आकार घेतला, विष्णुतेजाने बाहूंचा आकार घेतला. चंदा मामाच्या तेजाने स्तनाचा आकार घेतला.

इंद्र तेजाने मध्यकटिभाग तयार झाला.

वरूण तेजाने जांघेचा आकार घेतला आणि पृथ्वीच्या तेजाने नितंब आकारात झाले. ब्रम्हदेवांच्या तेजाने नारी स्वरूप पाय तयार झाले. सुर्याच्या तेजाने पायांना बोटे तयार झाली. अष्टवसुंच्या तेजाने हातांना लांबसडक बोटे तयार झाली. कुबेर तेजाने एक अतिसौंदर्यमय नासिका तयार झाली. प्रजापतीच्या तेजाने दात प्रदान केले.

अग्नीच्या तेजाने नेत्र तयार झाले.

सुषमा (संध्या) च्या तेजाने बाकदार भुवया तयार झाल्या.

वायु तेजाने दोन्ही कान तयार झाले.

अशा प्रकारे सर्व देवांच्या तेजाने सर्व अवयव एकवटून एक अत्यंत तेजस्वी मंगलदायक महादेवी तयार झाली.

''महिषासुरमर्दिनी''

अशी ही आख्यायिका आहे

तिने महिषासुर राक्षसाचा वध केला. तिन्ही लोक आनंदले.ही त्यामागची कथा आहे.

की जिच्या कृपेने आपण सतत श्वास घेतो. जिच्या जीवावर आपण निर्भय आहोत.

अशा या त्रिभूवन पालन किर्तिने महिषासुरमर्दिनी ने या दैत्यांचा पराभव केला. अखंड नऊ दिवस ती युद्ध करत होती, म्हणून नवरात्रोत्सव साजरा केला जातो.देवीप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा त्यामागे उदात्त भाव आहे मित्रांनो, आपण काय करतो तर प्रत्येक घरी कुलाचार केला जातो प्रथम घराची पूर्ण स्वच्छता केली जाते.रंगरंगोटी केली जाते. अश्विन शुध्द पक्षात अंबेची पूजा केली जाते परडीत पळसाच्या पानांची पत्रावळ तयार करून त्यावर माती ठेवली जाते सप्तधान्य ठेवून देवीला रोज एका वनस्पती फुलांची माळ वाहिली जाते. त्यावर रोज थोडं थोडं पाणी शिंजातं पहिल्या दिवशी विड्याच्या पानांची माळ अर्पण केली जाते,झेंडूच्या,तगरीच्या थोडक्यात काय तर ज्या ज्या प्रातांत जी जी पानं फुलं उपलब्ध असतात त्यांचीच माळ तयार करून ती देवी मातेला वाहिली जाते. अखंड नंदादीप तेवत ठेवला जातो. उपवास केला जातो. आठव्या दिवशी देवीला फुलोरा वाहिला जातो. रोज परडी भरली जाते पिठामीठाचा जोगवा वाहिला जातो. भजन,किर्तन,सतत नामस्मरण ,कुंकूमार्चन,

पादसेवन कुमारिका पूजन, हास्य म्हणजे गरबा, भोंडला, भारूड, हास्य या लोककलांचा उत्सव करून देवीची आराधना केली जाते. यामध्ये सर्व एकत्र येऊन उत्सवाचा आनंद घेणे. नानालंकार परिधान करणे, यथाविधी शोडशोपचार पूजा करून मातेप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते.

आपण यातून काय बोध घ्यायचा. तर अज्ञान रूपी अंधारातून प्रकाशमय ज्ञानाकडे जाण्यासाठी आजच्या काळातले देवी नवरात्र उत्सव साजरा करूया.

देवी सहस्त्रनाम म्हणून आपण तिचा जय जयकार करूया.

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी !
अनाथ नाथे अंबे करूणा विस्तारी !

## श्री सरस्वती मंदिर बासर

**ज्योतिर्मय साहित्य**



शरदेंदु समाकारे
परब्रह्म स्वरुपिनी
वासरापीठ निलये
सरस्वती नमोसतुते

तेलंगणातील निर्मल जिल्ह्यातील दुर्मिळ असलेले सरस्वती, शारदा मातेचे मंदिर बासर या ठिकाणी आहे. मराठवाडा नांदेड जिल्ह्याला जवळ असलेले हे मंदिर होय. महर्षि व्यासांनी शारदा देवीची उपासना केली त्यांनी हे मंदिर स्थापन केले. परिसरात व्यासांचे मंदिर आहे.

पं.महादेव शास्त्री जोशी म्हणतात

नमस्ते शारदे सरस्वती मतीप्रदे
वसततंम मम जिव्हाग्रे सर्व विधयाधन प्रदाभव अशी शारदे प्रति भाविक, भक्त विनंती करतात.

अक्षर अभ्यास नावाची पूजा प्रथम शाळेत जाणाऱ्या शाळकरी विद्यार्थ्यांकडून करवून घेतली जाते असे हे ख्यात किर्त क्षेत्र होय.

महाराष्ट्रात खरपुडी जिल्हा जालना मराठवाडा येथे व कर्नाटक शृंगेरी मठ येथेही शारदा मंदिर आहे.

लेखक कवी दुर्गादास
दि.पळसकर पुणे

शारदा या शब्दाची फोड केली असता निघणारा अर्थ महत्वपूर्ण असा आहे. शा=शालिनता र=रमणीयता दा= दाहकता असा होतो.

आजच्या धकाधकी च्या स्त्री अत्याचार पिडित काळात स्त्रीयांमध्ये शालिनता रमणीयता ह्या सोबत दाहकता गुण आवश्यक आहे हे या शारदा पूजन ''ललिता पंचमी नवरात्रोत्सवा च्या निमीत्ताने बोध घ्यावा व शारदा मातेचा जयजयकार करून शारदा देवीची खालिल प्रमाणे महति करावी.

''शारदे तू बुद्धीदायी तुझ्या समान तुच अससी
दुजी कुणी नाही'' विणा पुस्तक आणि लेखनी
संगीतपूजक बुद्धी दायीनी गजाननाला प्रिय होउनी
तुझे पूजन होई मयूरारूढ तू होउनी ऐसी
विधयामंदिरी प्रवेश करीसी तुला देखीता निरक्षरांचा
तिमीर दूर जायी ज्ञानदायी बुद्धीमाते
पद्मासन तू घालून बसते सामोरी हे व्यास ऊभे ते
सरस्वती आई बासरी(बासर) दास तुझा हा तुला विनविती
अज्ञानी ज्ञानी करी जो शालिनता रमणीयता दाहकता
त्रयी तुझे ठायी शारदे तू बुद्धी दायी
।बासर निवासी शारदा माता की जय ।

''कर बदर सदृशमखिलं भुवनतल ल
यतप्रसादतः कवयः
पसयंति सूक्ष्मतयः साजयती सरस्वती देवी= सरस्वती देवीच्या प्रसादाने क्रांती दर्शी कविंना अखिल ब्रम्हांड हे तळहातावरच्या बोटा प्रमाणे पाहता येते या सरस्वतीचा जयजयकार असो असेही म्हटले जाते.

अशा श्री क्षेत्र बासर सह सर्व ठिकाणी जाउन दर्शन घेवून कृतकृत्य व्हावे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559